# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/२०१३/८८८

दिनांक : 28 JUN 2013

COLLEGE OF PHARMACY MALKAPUR
Inward No 2510012013
Date 03/07/2013
To whom Marked
Signature

प्रति,
प्राचार्य,
इंदिरा बहुउद्येशिय शिक्षण संस्थेचे,
कॉलेज ऑफ फार्मसी,
हनुमान नगर, मलकापूर,
जि.बुलढाणा - ४४३ १०१.

**( Institute Code 1136 )**

विषय : शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच सुरु असलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्याबाबत.

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/१-१३६४१८७८२३/२०१३/ईओए, दि. १९ मार्च, २०१३.
२. शासन निर्णय, क्रमांक - टिईएम-२०१३/प्र.क्र.१७७/तांशि-४, दि. १५ मे, २०१३.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून खालील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत खाली दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | बी.फार्म. | ६० – १२० * |

*** येथे असे नमूद करण्यात येते की, उपरोक्त अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढविण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णयामधील अट क्र.१४ नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांना राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी फी प्रतिपूर्तीची योजना लागू राहणार नाही. याबाबतची सूचना संस्था स्तरावरुन विद्यार्थ्यांना देण्यात यावी तसेच याबाबतची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावरुन ठळकपणे नमूद करावी.**

सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा – मलकापूर, येथे खाते क्र. ३३०२६११९५७१, दि. २९.०५.२०१३, अन्वये रु.१.५० लाख संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच १००/- च्या स्टॅम्प पेपरवर शर्ती व अटी मान्य असल्याबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे. तरी वरील अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतावाढीस व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून या संचालनालयाकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१. सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेस **कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांची संलग्नता घ्यावी लागेल.

To Kakhave madam
Keep it with DTE Inward
03.07.13

२. प्रवेशक्षमता वाढीस दिलेली मंजूरी विना-अनुदान तत्वावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे आवर्ती व अनावर्ती अनुदान शासनाकडून मंजूर केले जाणार नाही.

३ विना-अनुदान पदवी अभ्यासक्रमाच्या बाबतीत वेळोवेळी राज्यशासन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद तसेच संचालनालयाकडून करण्यांत आलेल्या/येणा-या नियमांचे, प्रवेश नियमांचे, आरक्षण, शिक्षण शुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४. वाढीव प्रवेशक्षमतेसाठी विद्यापीठ व राज्यशासन यांच्या मानके व प्रमाणके नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्त करण्यांत यावी व त्यांना नियमांप्रमाणे वेतन व भत्ते देण्यात यावेत.

५. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

६. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट,१९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

७. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमांक व पासवर्डद्वारे** शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत,
१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा. **कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, **अमरावती** यांना माहितीस्तव सादर.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/एम.फार्म/मान्यता/२०१०/ 2297
दिनांक : 26 NOV 2010

प्रति,
प्राचार्य,
इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्थेचे,
कॉलेज ऑफ फार्मसी,
हनुमाननगर, मु.पो.मलकापूर,
जिल्हा-बुलढाणा-४४३ १०१.

Buldana's College of Ph... Inward No. 1319-10 Date 7-12-10 Malkapur

**(Institute Code 1136)**

विषय : शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.
संदर्भ :शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१०/(१८८/२०१०)/तांशि-४, दि.३० जुलै, २०१०

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | एम.फार्मसी इंडस्ट्रियल फार्मसी | ००-१८ |
| २. | एम.फार्मसी फार्मास्युटिक्स | ००-१८ |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०१०-११ पासून विना अनुदान तत्वावर नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास व विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.

२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१ अ,दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावेत व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यांत येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

४. संस्थेने वरील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून भारतीय स्टेट बँक शाखा मलकापूरयेथे प्रत्येकी रु.२.०० लाख असे एकूण रु.रु.४.०० लाख पावती क्र.३२७१८९, दि.२०.१०.२०१० अन्वये संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ६० महिन्यांसाठी जमा केलेले आहेत.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई शिक्षण शुल्क समिती, मुंबई, प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाची फी निर्धारित करण्यासाठी शिक्षण शुल्क समिती बांद्रा यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यांत यावा. सदर अभ्यासक्रमाचे शुल्क शिक्षणशुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे आकारण्यात यावे. निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त फी आकारु नये. विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त शुल्क आकारल्यास व याबाबत विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकाकडून तक्रार प्राप्त झाल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास होणा-या सर्व परिणामास संस्था जबाबदार राहील.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके इत्यादी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व कुलसचिव, **संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

९. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र शासन किंवा **संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेत आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

१०. सदर संस्था संचालक,तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा कुलसचिव,**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांच्याकडून घेतल्या जातील.

११. संस्थेला कुलसचिव, **संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१२. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही, तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१३. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कटोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

१४. सदर अभ्यासक्रमासाठी **फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली** मान्यता घेणे बंधनकारक राहिल.

१५. शासनाने,या संचालनालयाने कुलसचिव, **संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/कौन्सिल ऑफ

इंडिया, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

१६.संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमाक व पासवर्डद्वारे** शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

**(डॉ. सु. का. महाजन)**
प्र.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत,

१. मा.सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा.कुलसचिव, **संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, **अमरावती** यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३ (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक : २/एनजीसी/फार्मसी/मान्यता/२०११/५३६९

दिनांक : 8 DEC 2011

प्रति,
प्राचार्य,
इंदिरा बहुउद्येशिय शिक्षण संस्थेचे,
कॉलेज ऑफ फार्मसी,
हनुमाननगर, मलकापूर,
जि.बुलढाणा – ४४३ १०१.

COLLEGE OF PHARMACY MALKAPUR.
Inward No. 1491/11
14.12.2011
Signature

## Institute Code 1136

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास व सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :** शासन निर्णय, क्रमांक – संकिर्ण-२०११/(१५७/२०११)/तांशि-४, दिनांक ३० जून, २०११.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून विना-अनुदान तत्वावर खालील औषधनिर्माण शास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | एम. फार्म. (क्वालिटी ॲश्युरन्स) | १८ |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून विना अनुदान तत्वावर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.

२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१, दि. २१ मे, १९८३ अनवये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटीव शर्ती आपणास बंधनकारक असतील.

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहिल.

४. शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून विना अनुदान तत्वावर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून **रु.२.०० लाख पावती क्र. ७६२८६९ दि.२४.१०.२०११ अन्वयें स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-मलकापूर, येथे** संस्थेचे सचिव व संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई शिक्षण शुल्क समिती, प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाचे शुल्क शिक्षणशुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे आकारण्यात यावे. निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त फी आकारु नये. विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त शुल्क आकारल्यास व

याबाबत विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकाकडून तक्रार प्राप्त झाल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास होणा-या सर्व परिणामास संस्था जबाबदार राहील.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके इत्यादी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

९. तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन किंवा **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेत आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

१०. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांच्याकडून घेतल्या जातील.

११. संस्थेला **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१२. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०११-१२ साठी प्रवेश नियमात विहीत केलेल्या तरतुदीनुसार केंद्रिभूत प्रवेश पक्रियेद्वारे करण्यांत येतील.

१३ .विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही, तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१४. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

१५. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमाक व पासवर्डद्वारे** शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

१६. शासनाने, या संचालनालयाने **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली** यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत,

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा. **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३ (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
6. निवड नस्ती.

महाराष्ट्र शासन
## तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६५/४९२/४७५/४४२/४४३
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:http://www.dtemaharashtra.gov.in

कार्यालयीन आदेश :
क्र. २/एनजीसी/मान्यता/फार्मसी/२०२५(२३-२४)/ ८०3 दिनांक: 15 JUL 2025

विषय : फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यतेबाबत......

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२४/प्र.क्र. १४१/तांशि-४, दि. १० जुलै, २०२४

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भीन शासन निर्णयांन्वये सोबतच्या " विवरणपत्र अ " मध्ये विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. संदर्भांकित शासन निर्णयास अनुसरुन या संचालनालयाच्या अधिपत्याखालील येणा-या सोबतच्या "विवरणपत्र अ " मधील संस्थेने संदर्भीन शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेबाबतची कागदपत्रे या संचालनालयास उपलब्ध करुन दिली आहेत.

तसेच शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वयें अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले असून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विना अनुदान तत्वावर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु. ३.०० लाख खाते क्र. ४४०२५७०८००८ दि.२३.०४.२०२५ अन्वयें स्टेट बँक ऑफ इंडिया. शाखा- मलकापूर, जि.बुलढाणा येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. सदर शासन निर्णयात निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क इ. बाबतची कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच संबंधित विद्यापीठ / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता संलग्नता / तात्पुरती संलग्नता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भीन शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून "विवरणपत्र अ" मध्ये दर्शविलेल्या विद्यमान संस्थेतील नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास व सदर अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसीत केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली व या संचालनालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, यांना राहतील.

५. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये ज्या बाबींसाठी दुस-या वर्षासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव विहित केलेली आहे, अशा बाबींसाठी संबंधित संस्थांनी दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी संस्थेचे अध्यक्ष / सचिव व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नांवे १० वर्षासाठीची मुदतठेवीची पावती पडताळणीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६. ज्या सस्थांच्या अभ्यासक्रमांना संबंधित विद्यापीठाने संलग्नता अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रदान केली असल्यास संलग्नतेच्या आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता संबंधित संस्थांना करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित संस्थांना विद्यापीठ / मंडळाच्या नियमांप्रमाणे नियमित संलग्नता घेणे बंधनकारक राहील.

७. सक्षम प्राधकि-याच्या मान्यतेचे आग प्रतिबंधक प्रमाणपत्र असणे व या प्रमाणपत्राचे वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

८. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी / कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद / शासन / विद्यापीठ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व या व्यतिरीक्त वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे विवरणपत्र “अ” मधील संस्थेस बंधनकारक राहील.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
४. संबंधित संस्था
५. कार्यासन क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्ती

Annexure

Directorate of Technical Education, M.S.,Mumbai. Office Order No. 2/एनजीसी/मान्यता/फार्मसी/2025(23-24)/

| Sr. No. | Institute Code | PCI Code | Name of the Institute | Institution Type | University | Level | Program | Name of Course | Intake Approved for 2022-23 | Intake Approved for 2023-24 | Approval for | Government Resolution No & Date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1136 | PCI - 878 | Indira Bajuuddeshiya Shikshan Sanstha Buldana College of Pharmacy Malkapur Buldana Road Malkapur Dist Buldana Malkapur 443 101 | Un-Aided | Sant Gadge Baba Amravati University Amravati | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Chemistry | 0 | 15 | New Course | शासन निर्णय क्रमांक मान्यता 2024/प्र.क्र.141/तांशि-4, दि.10.07.2024 |

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एआयसीटीई/पदविका/मान्यता/२०१२/ 9006

दिनांक : 14 SEP 2012

COLLEGE OF PHARMACY MALKAPUR
Inward No 1656/12
Date 27/09/12
Townome Marked
Signature

प्रति,
प्राचार्य,
इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्थेचे,
आयबीएसएस कॉलेज ऑफ फार्मसी,
हनुमाननगर, मलकापूर,
जि. बुलढाणा-४४३१०१.

**[1136]**

**विषय : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेस शासनाची मान्यता देण्याबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०१२/(१३९/१२)/तांशि-५, दि. ३० जुन, २०१२.
२) या संचालनालयाचे पत्र क्रमांक : १०/एनजीपी/मुदतठेव/२०१२/२००७,
दि. ९.८.२०१२.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, शासनाने संदर्भाधीन क्रमांक-१ च्या शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी खालील अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेमध्ये वाढ करण्यास विहीत अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | अभ्यासक्रमाचा प्रकार | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | फार्मसी PH | रेग्युलर सेकंड शिफ्ट | ००-६० |

आपण संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व सचिव, इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, मलकापूर यांच्या संयुक्त खात्यात वरील अभ्यासक्रमासाठी रु. ३.०० लाख, बँक ऑफ इंडिया, शाखा मलकापूर येथे पावती क्रमांक २४१२३२० दिनांक ३०.८.२०१२ अन्वये ५ वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच शासन निर्णयात नमूद केलेल्या अटीचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेल्या अभ्यासक्रमास सन २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर त्यापुढे दर्शविलेली प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

३. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : टिईएम ३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१(अ), दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.

४. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यांत यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

५. संस्थेतील कर्मचारी व शिक्षकांचे मासिक वेतन बँकेमार्फतच करावे.

६. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई याच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. संचालक किंवा या संचालनालयाने प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याचा अधिकार संचालनालयास राहील.

९. शासन किंवा या संचालनालयाने किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणाऱ्या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

१०. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांच्याकडून घेतल्या जातील.

११. संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१२. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१३. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

१४. सदर अभ्यासक्रमास **फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया** ची मान्यता घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादरः-

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.
२. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर.
५. प्रणाली विश्लेषक, मुख्य कार्यलय, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६. कार्यासन क्रमांक २-अ, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी.
७. निवड नस्ती.